# बुद्धोत्तरकालीन भारतीय स्त्री

**डॉ. प्रतिभा बी. पखिडे**

डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस.

कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

भारतात 7 व्या आणि 8 व्या षतकापर्यंत बुद्ध धर्माचा प्रभाव होता. परकीय आक्रमनांनी भारतातील राज्ये जिंकली, त्यांनी बौद्ध धर्माचा स्विकार केला. जेवढी परकीय आक्रमने झाली त्याचा धर्म हिंदूनी स्विकारणे पसंत केले. अस्पृष्य आदिवासी, षुद्र या वर्गाना ब्राम्हणी अथवा वैदिक, सामाजिक व राजकीय असे कोणतेच स्थान नव्हते. बुद्ध धर्माचा संपूर्ण समाज विशमतेने विघटित झालेला होता अषा समाजावर राज्य करणे परकीय धर्म आणि सत्तेला सोपे गेले. बुद्ध धर्माच्या ऱ्हासाबरोबरच स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्यही नश्ट झाले भिक्षुणी संघ बुद्ध काळात निर्माण झाला.

वैदिक काळात आणि बुद्ध काळात मुलीकडे पाहण्याच्या दृश्टीकोनात जमीन अस्मानाचा फरक होता. बुद्धपूर्व काळात कुमारिकांना कुटुंबावरील ओझे समजण्यात येई आणि मुलींचा जन्म हा आई बापांना संकट अथवा पाप वाटत असे. बुद्ध काळात जन्मास आलेले मूल 'पुत्त' या षब्दाने संबोधिले जाई 'पुत्त' हा षब्द कन्या व पुत्र या दोन्ही अर्थी वापरण्यात येत असे. बुद्ध कालीन व बुद्धोत्तर भारतीय समाज जीवनामध्ये स्त्रियांचे स्थान हे पुरुशाला दुय्यम अषा प्रकारचे होते. बुद्धाच्या काळापर्यंत भारतामध्ये पुरुश प्रधान समाज व्यवस्था आक्रमकतेने प्रविश्ट झालेली होती. वैदिक संस्कृति ही मुळतः पुरुशप्रधान स्वरुपाची होती. स्त्रियांच्या वाट्याला पुरुशापेक्षा दुय्यम व विशम जीवन आलेले होते. स्त्रिला 'चुल आणि मूल' एवढेच तिचे जीवन होते, स्त्रिला माणूस म्हणून स्वतंत्र व मानाने जीवन जगता येत नव्हते. बौद्ध तत्वज्ञानाचा प्रारंभ बुद्धापासूनच होते. सिद्धार्थ गौतम बुद्ध हे बुद्ध तत्वज्ञानाचे प्रणेता आहेत बुद्धापासूनच मानवी चिंतनामध्ये एक जागतिक क्रांती घडून आली. जीवनाकडे पाहण्याचा एक नवा जीवन दृश्टीकोन मानवाला प्राप्त झाला. बुद्धाचे तत्वज्ञान हे जीवनवादी होते त्याचप्रमाणे ते जीवनामध्ये आमुलाग्र अषा सम्यक स्वरुपाची क्रांती घडवून आणणारे होते. म्हणूनच त्यांच्या विचाराचा

त्याच्या तत्वज्ञानाचा परिणाम तत्कालीन लोक समुदायावर फार मोठ्याा प्रमाणात झालेला आढळून येतो.

बुद्धाच्या विचाराचा परिणाम केवळ पुरुश वर्गावरच झाला असे नाही तर स्त्री समाजावर सुद्धा झालेला आढळून येतो. स्त्रियासुद्धा भिक्षुणी होऊन परिव्रजिका होवून गृहस्थ जीवनाचा त्याग करुन मुक्तपणे संचार करण्याकडे प्रवृत्त झाल्यात. पूर्ण स्वातंत्र हा मानवी स्वभाव आहे ही प्रवृत्ती जषी पुरुशाची आहे तषीच ती स्त्रिची सुद्धा आहे. नैसर्गिकरित्या प्रत्येक मनुश्य स्वतंत्र्य आहे हिच बौद्ध तत्वज्ञानाची मुळ प्रेरणा आहे आणि म्हणूनच प्रत्येक स्त्री आणि पुरुश आपल्या मुळ प्रेरणेकडे प्रवृत्त होत असतो. सामाजिक जीवनामध्ये गृहस्थ जीवनामध्ये मनुश्य बंधनामध्ये बंदिस्त करण्यात येतो ह्याापासून पूर्ण मुक्ती करण्याकरिताच बौद्ध तत्वज्ञान मांडले व त्याला अनुरुप नव समाजाच्या निर्मितीकरीता व त्याच्या विचारांचा प्रचार जनसामान्यामध्ये व्हावा म्हणून त्यांनी भिक्षु व भिक्षुणी संघाची स्थापना केली हा भिक्षु व भिक्षुणी संघ बुद्धाच्या काळापासून आजपर्यंत अस्तित्वामध्ये आहे. संबोधी प्राप्तीच्या पाचव्या वर्शी धम्म प्रचाराच्या संदर्भात भगवान बुद्ध वैषाली येथे थांबले होते तेव्हा वडीलांना पाहण्यास कपिलवस्तूला जावे लागले त्याच्या प्रथम आगमनाने कपिलवस्तू नगरीतील जनमानस प्रभावित झाले. कपिलवस्तू आगमनाच्या वेळी महामाया प्रजापती गौतमी व प्रमुख 500 स्त्रियांनी प्रवजित होण्याचा संकल्प बुद्धासमोर व्यक्त केला. काही दिवसानंतर कपिलवस्तूवरुन महाप्रजापती गौतमी व प्रमुख स्त्रियांचा प्रवजित होण्याचा दृढ निष्चय होता त्यानंतर महामायेने बुद्धासमोर आपली प्रवजित होण्याची इच्छा प्रगट केली पुरुशाप्रमाणे स्त्रियांना संघात प्रवेष मिळावा, स्त्रियांनाही बुद्धाच्या तत्वज्ञानाप्रमाणे मुक्त जीवन जगता यावे अषी तिची आग्रही भूमिका होती. काही अटीवर त्यांना जीवनभर अनुलंघनीय अषा आठ गुरुधर्माला स्थापित केले असे भगवंतानी प्रतिपादन केल्यावर महाप्रजापती गौतमीने आठ गुरुधर्माला स्थापित केले. महाप्रजापती गौतमीने आठ गुरु धर्माला मान्य करुन भगवंताच्या धर्मात पाचषे षाक्य स्त्रियासोबत भिक्षुनींची दीक्षा घेतली. स्त्रियांची भिक्षुणी म्हणून ही पहीली प्रवज्जा व दीक्षा होती. एकाच वेळी एकाच ठिकाणी पाचषे स्त्रिया प्रवजित होऊन भिक्षुणी झाल्या. त्यामुळे आपोआपच भिक्षुणी संघाची निर्मिती झाली. जगाच्या इतिहासात हा स्त्रियांचा पहीला संघ होता ज्यात स्त्रिया स्वेच्छेने सामील झाल्या होत्या. जगाच्या इतिहासातील स्त्री मुक्तीची ही पहीली आणि ऐतिहासिक घटना होय ज्यात पुरुशाच्या

बरोबरीने स्वतःला समजून ज्ञानाच्या समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रात ती समानतेच्या तत्वाचा अनुभव करते. वैदिक व ब्राम्हणी संस्कृतीच्या प्राबल्याने भारतीय स्त्रियांना धर्मरुढीमुळे व परंपरागत समजुतीमुळे दुःख उपेक्षा सहन करावी लागत होती. वैदिक ब्राम्हणी धर्माने स्त्रियांना दुय्यम स्थान दिले. गुलामीचे जीवन त्याच्या वाट्याला आले ती पुरुशाची दासी होती तिला ज्ञानधिकार नव्हता. आत्मउन्नतीचा मार्ग तिच्यासाठी बंद होता. गुलामीचे जीवन त्यांच्या वाट्याला आले ती पुरुशाची दासी होती तिला ज्ञानधिकार नव्हता परंतु बुद्धापासुन खऱ्या अर्थाने 'चुल आणि मुल' ही परंपरा सुटल्या गेल्या स्वतंत्र्य विचाराच्या अथांग सागरात स्त्रिया वावरु लागल्या. बुद्ध तत्वज्ञानाची प्रभावी मोहीम ही सर्वस्पर्षी ठरले भिक्षुणी संघ स्थापन करुन स्त्रियांच्या इतिहासाला वेगळे वळण लागलेले बौद्ध धर्माचे सर्वात मोठे वैषिश्ट्यो म्हणजे त्यात स्त्री व पुरुश दोघांनाही समान तऱ्हेने जीवन व्यापन करण्याची समान संधी होती. बौद्ध धर्म समाजामध्ये प्रतिश्ठित आला. भगवान बुद्धाने स्त्रियांकरिता स्थापन केलेल्या वेगळ्याा संघामुळे बौद्ध धम्माच्या प्रसारावर फार मोठा परिणाम झाला. जनमाणसावर त्याचा फार मोठा प्रभाव पडला स्त्रियाला सन्मान प्राप्त झाला ती आपल्या योग्यतेने आचरणाने गुणवत्तेने समाजात आदरणिय, पुजनीय ठरली. ती ज्ञानाच्या क्षेत्रात मुक्तपणे संचार करणारी झाली. बुद्धाची कन्या म्हणून तिला प्रतिश्ठा प्राप्त होवू लागली. तिच्या जीवनातील एक क्रांती होती ती क्रांती समाज मान्य करु लागली. बौद्ध धम्माच्या उच्च प्रतीच्या सर्वक्षेश्ठ आदर्षामुळे प्रेरित होऊन भारतीय स्त्रीने आपल्या जीवनात परिवर्तन घडवून आणले विहाराच्या रुपाने षिक्षणसंस्था निर्माण करुन त्यांना त्याच्या आत्मउन्नतीचा मार्ग दाखवून त्याच्या व्यक्तीत्वाच्या विकासासाठी स्थान संवर्धनाचा स्वातंत्र्याचा मार्ग मोकळा करुन दिला. भगवान बुद्धाने स्त्रियांना पुरुशापेक्षा हीन अथवा कमी दर्जाचे कधीच मानले नाही. स्त्रिचे नैसर्गिक जीवन तिचे स्त्रित्व तिच्या विकासाच्या आड येवू षकत नाही फक्त तिला संधी मिळाली तर ती स्वतःला सबलाच नाही तर प्रबला ही होवू षकते हा सर्वात मोठा आषावाद बुद्धाने फुलविला. बुद्धाने स्त्रिला आषावादी बनविले, ध्येयवादी बनविले या भिक्षुणी संघात स्वतः भगवान बुद्धाची मावषी महाप्रजापती गौतमी पत्नी यषोधरा मगध राजवंषाच्या राजकुमारीका होत्या तर काही वैष्यवर्गीय होत्या. वेष्या, गणिका, नृत्यागणा, दासी, दासी कन्या अषा तत्कालीन समाजातील सर्वच स्तरातील स्त्रिया या भिक्षुणी संघामध्ये सहभागी झालेल्या होत्या.

थेरी गाथेतील भिक्षुणीचे बौद्ध तत्वज्ञानातील स्थान व महत्व याचा अभ्यास करताना एक गोश्ट लक्षात येते की भिक्षुणींनी तथागत गौतम बुद्धाप्रमाणेच धर्म प्रचारासाठी ठिकठिकाणी पायी फिरत राहील्यात. त्यांनी लोकांना डोळस होण्याचा उपदेष दिला त्यांनी बुद्धाची षिकवण घरोघरी पोहचवली त्यात त्यांनी स्त्रियांमध्ये जागृती आणण्याचे महत्वाचे कार्य केले त्यांनी अंधश्रद्धा, देवीदेवता, यज्ञयाग या गोश्टीचा निशेध केला. बुद्धाची मुळचीच वृत्ती षांत व चिंतनात्मक असल्यामुळे जीवन तत्वज्ञान भिक्षुणींनी ताबडतोब आत्मसात केले कारण ते सोपे, सरळ आहे बुद्धाची षिकवण त्यांच्या चार आर्यसत्यामध्ये समावलेली आहे. बौद्ध धम्माचे सर्व सार म्हणजे अश्टांगमार्ग होय. गौतम बुद्धाने धम्माला नितिचा पाया घातला त्यांनी मानवी जीवनात नितिला फार महत्व दिले नैतिक मूल्याची जपणूक म्हणजेच बौद्ध धम्म होय यांची जपणूक थेरी गाथेतील सर्व भिक्षुणींनी केलेली आपल्या प्रत्ययास येते त्यात समानता, प्रामाणिकता, त्याग, धैर्य, औदार्य, दया, क्षमा, षांती या गोश्टी आपल्या आचरणात आणीत द्वेशाने नव्हे तर प्रेमाणे सत्कार्याने अभिलाशेच्या औदार्याने प्रमाणिकपणे निवारण करता येते असा आदेष आहे. निर्वाण हेच सर्वश्रेश्ठ सुख आहे. अंश्टांग मार्गाचे आचरण केल्याने निर्वाणप्रत जाता येते. दुःख हे सत्य असून जन्म, मरण, जरा, व्याधी, लोभ, तृश्णा ही त्याचीच रुपे आहेत. म्हणूनच दुःखावर आपण विजय मिळविला पाहीजे असा उपदेष भिक्षुणी देत असत. भिक्षुणी संघातील सर्व भिक्षुणींनी आपले चारित्र्य अत्यंत षुद्ध व स्वच्छ ठेवले होते. अनुयांयाना मार्गदर्षनार्थ नैतिक नियम घालून दिले होते. भगवान बुद्धाने आपली मावषी गौतमीची इच्छा जाणून आणि आनंदाच्या विनंतीला मान देवून महिलांना सद्धम्म व संघाचे दार मुक्त केले. मानवी मनाला क्षणोक्षणी भुरळ घालुन पथभ्रश्ट करणाऱ्या माराने जेव्हा तिला फुस लावण्याचा प्रयत्न केला तेव्हा षैला भिक्षुणी म्हणते हे पापी मारा भोगाचे सुख तर मला भाल्याच्या प्रहाराप्रमाणे ह्याा नष्वर षरीराला जखमी करणारे वाटते. माझ्या भोगषक्तीचे मी दमन केले. माझ्या अज्ञानाच्या अंधकार नश्ट झाला आहे अषा प्रकारची सर्वोकृश्ट निर्मल षांती व निवृत्ती ज्या तथागत बुद्धांच्या अनुकंपेमुळे मिळाली त्याच्याबद्दल श्रद्धा व कृतज्ञता नाही अषा अनेक थेरी व्यक्त करताना म्हणतात 'अहं बुधस्त थिता ओरस जाता' अर्थात मी बुद्धाची औरेस या महामानवाला तथागत गौतम बुद्धाचा प्रणाम मनुश्य जन्माप्रमाणे स्त्री जन्म दुःखदायक असल्याची पूर्ण जाणीव होती परंतु त्या स्त्रित्वाला आपल्या पायातील बेडी किंवा धोंड मानीत नाही, भगवान बुद्धाच्या उपदेषाने प्रेरित होवून

आत्मसंयमी होवून भिक्षुणी संघात प्रविश्ठ होवून थेरी गाथेतील भिक्षुणी आत्मविष्वासपूर्वक निर्भिडपणे गातात चित्त समाधीमध्ये मग्न आहे. फाषीवर जायला निघालेल्या चोरावर आसक्त होवून त्याला अर्पण करणारी स्त्री येथे आढळते तसेच धनासाठी तो तिचा जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाही. पुरुशावर प्रेम करणारी व त्यासाठी सर्वस्व अर्पण करणारी परंतु दृश्ट प्रवृत्तीच्या पुरुशाला युक्तीने कड्यााावरुन लोटून देण्यास मागेपुढे न पाहणारी स्त्री येथे आढळते. भद्राकुडळकेसा थेरी होवून अर्हत्व प्राप्त करते हे स्त्रिच्या करुणतेच्या प्रसंगी षौर्याचे अतिषय मार्मिक उदाहरण आहे. याचप्रमाणे आपल्या पती, संतती, भाऊ व आई वडील, मृत्यू पावल्याच्या दु:खाने वेडी झालेली पराचारा बुद्ध प्रभावाने वेडमुक्तच होत नाही तर ती अर्हत होवून एकांतात ध्यान करायला बसते.

पटाचाराबद्दल दु:ख व्यक्त करीत तिची षिप्या चंद्रा थेरी म्हणते विधवा व वांझ अषी मी भंयकर संकटात होते सगे सोयरे कुणीच सहायक नव्हते अन्न वस्त्र मला मिळत नव्हते. ऊन, वारा, थंडीने व्याकुळे मी सात वर्शापर्यंत भटकत राहीले एके दिवषी अन्न पाणी देऊन दयाळू, पटाचाराने मला प्रवजित करुन कृपा केली आपले दु:ख विसरुन दुसऱ्याचे अश्रु पुसण्याची व मदतीला हात देण्याची प्रेरणा या थेरीच्या जीवन वाणीतुन सतत मिळते अषा ह्याा महामानव तथागत गौतम बुद्धाने वैदिक परंपरेला झुगारुन तत्वज्ञानाच्या पातळीवर सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये स्त्रिला समाजामध्ये दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला आणि त्याचा परिणाम समाजातील वेगवेगळ्याा स्तरातील स्त्रिला बुद्धाच्या प्रभावाने प्रभावित होऊन भिक्षुणी संघात प्रविश्ठ झाल्या. तत्कालीन स्त्रिया पुरुशाप्रमाणे मुक्ती मार्गावर आरुढ होवून निर्वाणासारख्या पदाला पोहचल्या होत्या. बुद्धकालीन स्त्री ही पराक्रमी करुणामय, ज्ञानवान, षिलवान, त्यागी, मुक्त अषा स्वरुपाची आहे. स्त्री उद्योगी आहे आळसावर विजय प्राप्त करणारी आहे.

निर्वाण हा तिच्या जीवनाचा परमोच्च आनंद आहे. बुद्धकालीन भिक्षुणीच्या जीवनामध्ये द्वेश, जातीभेद, विशमता, घृणा, आळस, स्वार्थिपणा, निंदा, चुगली, चहाडी इत्यादी प्रवृत्तींना थारा नाही तर त्याच्यात परस्पराप्रती प्रेम, सहकार्य, मैत्री, सदभाव आढळून येते.

## निश्कर्श :–

बुद्धपूर्व काळात स्त्रियांना पुरुशाच्या बरोबरीचे स्थान नव्हते. वैदिक धर्माने तिला तात्विक अधिश्ठान प्राप्त करुन दिले. बुद्धाने समाजामध्ये समान दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न केला त्याचा परिणाम म्हणजे समाजातील सांस्कृतिक, आर्थिक स्तरातील स्त्रिया बुद्धाच्या विचाराने प्रभावित होवून भिक्षुणी संघ निर्माण झाला. 20 व्या षतकात स्त्री मुक्तीच्या नावाखाली चालणाऱ्या अनेक चळवळींना सुद्धा बुद्ध कालीन स्त्री मार्गदर्षक ठरु षकते. बुद्धकालीन स्त्रिने नैतिक मूल्याची जपणूक करुन प्रेम, सहकार्य, मैत्री, सदभाव, दया, क्षमा, षांती, त्याग या गोश्टी या तत्वाला जीवनाषी जोडले बौद्ध तत्वज्ञानाचा पाया या देषात मजबूत केला.

## संदर्भ ग्रंथ सूची :–


1) गनविर प्रभाकर, सुत्तचिटकातील बुद्धकालीन समाज जीवन, टंकित पीएच.डी. षोधप्रबंध, नागपूर, विद्यापीठ, 1973.

2) तिरपुडे काला, विनय पिटकाचा सांस्कृतिक अभ्यास टंकित पीएच.डी. षोधप्रबंध, नागपूर, विद्यापीठ, 1974.

3) उपाध्याय भरतसिंह, पालि साहित्य का इतिहास प्रयाग 1952, बुद्धकालीन भारतीय भूगोल थेरी गाथा, दिल्ली, 1967, बोधिवृक्ष की छत्रछाया ने दिल्ली. 1986.

4) कष्यप भिक्षु जगदीष, उदान अनुवाद खुदक निकाय विहारराजकीयेन पालि पकासन मण्डलेत पकासिता 1960, अनुवाद चुल्लवग्ग विहारराजकीयेन पालि पकासन मण्डलेन पकास्तिा, 1956, संयुक्त निकाय, विहारराजकीयेन पालि पकासन मण्डलेन पकास्तिा, 1954.